# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा- सन २०२४-२५

**-:संयोजक:-**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**

**ता – वाळवा, जि – सांगली**

**शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा- सन २०२४-२५**

- **संयोजक – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **प्राचार्य – डॉ. नितीन शिंदे मो. नंबर – ९४२३२७१६३६**
- **शारीरिक शिक्षण संचालक – प्रा. अमितराज उत्तमराव माने**
- **मो. नंबर – ७२१९५११७७७**
- **स्पर्धा ठिकाण – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **स्पर्धा कालावधी- ०२ दिवस (१४,१५ ऑक्टोबर २०२४)**
- **स्पर्धा क्रीडा प्रकार – व्हॉलीबॉल (पुरुष)**
- **संयोजन समिती -**

| अ. क्र | सदस्याचे नाव | पदनाम | सही |
|---|---|---|---|
| १ | प्र.प्राचार्य डॉ.नितीन शिंदे | अध्यक्ष | |
| २ | उपप्राचार्य डॉ. पी.व्ही.गायकवाड | सदस्य | |
| ३ | उपप्राचार्य प्रा.एस.बी.पाटील | सदस्य | |
| ४ | उपप्राचार्य डॉ. संदीप एस. पाटील | सहसचिव | |
| ५ | पर्यवेक्षक प्रा.एम.टी.खंडेलोटे | सदस्य | |
| ६ | डॉ. पी. ए. गंगणमाले | सदस्य | |
| ७ | डॉ. पी.एम.आठवले (सिनी.कार्याध्यक्ष ) | सदस्य | |
| ८ | प्रा.एच.बी.वसावे (ज्युनि.कार्याध्यक्ष) | सदस्य | |
| ९ | डॉ.बी.ए.सावंत | सदस्य | |
| १० | डॉ.सौ.एस.पी.परदेशी | सदस्य | |
| ११ | डॉ. अमितराज उत्तमराव माने | सचिव | |
| १२ | प्रा. के. आर. ठाकरे | सहसचिव | |
| १३ | श्री.अजित यशवंत पाटील | प्रशासकीय कर्मचारी | |

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**अंतर्गत**
**सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा सन २०२४-२५**
**-:संयोजक:-**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
**ता. वाळवा, जि. सांगली**

---

## -: स्पर्धा अहवाल :-

दि. १४ व १५ ऑक्टोबर २०२४ रोजी इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेस सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूरचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या प्रा.सौ. स्मिता पाटील, वाळवा तालुका क्रीडा अधिकारी श्री. जमीर आत्तार, कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. अजित पाटील, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एम टी. खंडेलोटे, कॉलेजचे प्रभारी रजिस्टार श्री. विनायक गुरव, त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. ॲड. एन आर पाटील (काका) यांनी खेळाडूंना शुभेच्छा देताना आपल्या मनोगतातून खेळाचे महत्व व त्यामुळे होणारे फायदे आपणास कसे मिळतात याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. संदीप पाटील यांनी केले तर आभार प्रा. कमलेश ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमितराज माने यांनी केले. या स्पर्धेमध्ये एकूण १० संघांचा सहभाग असून या स्पर्धा दोन दिवस चालणार आहेत.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांचे हस्ते झाले त्यांनी सर्व विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या तर ज्यांना विजय मिळवता आला नाही अशा सर्व खेळाडूंनी अधिक परिश्रम करून पुन्हा नव्या जोमाने स्पर्धेत भाग घ्यावा असे सांगितले. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. अजित पाटील, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एम टी. खंडेलोटे, कॉलेजचे प्रभारी रजिस्टार श्री. विनायक गुरव, त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना कॉलेजच्यावतीने ट्रॉफी देण्यात आल्या. तर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व पंचांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेतून विजयी झालेले संघ दि. २३ व २४ ऑक्टोबर २०२४ रोजी मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय बोरगाव येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेत खेळतील. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी सहकार्य केले. तर जिमखाना विभागाचे प्रा. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.

- **स्पर्धेतील विजेते संघ** :-

  **१. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूर – प्रथम क्रमांक**

  **२. अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग आष्टा – द्वितीय क्रमांक**

  **३. डॉ. पतंगराव कदम आर्ट्स व कॉमर्स महाविद्यालय रामानंदनगर – तृतीय क्रमांक**

  **४. वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली- चतुर्थ क्रमांक**





